# प्रेसनोट

## ठाणेदार शिरपुर यांनी लावले पोलीस स्टेशन मध्येच प्रेमी युगुलाचे लग्न

दिनांक २०.०१.२०२२ रोजी तक्रारदार पुष्पा शिवाजी जाधव रा. शिरपुर यांनी त्यांचा मुलगा गणेश शिवाजी बाजड वय २१ वर्षे हा घरुन निघुन गेल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन मिसींग क्रमांक ०२ नोंद करण्यात आले होते. तसेच सिंधुबाई घनश्याम मानवतकर रा. शिरपुर यांनी त्यांची मुलगी नामे शिवानी घनश्याम मानवतकर वय २० वर्षे ही घरुन काहीही न सांगता निघुन गेल्याबाबत दिलेल्या तक्रारी वरुन मिसींग नोंद क्रमांक ०३ अन्वये नोंद करण्यात आले आहे. दोन्हीही प्रकरणांचा तपास बिट अंमलदार महादेव चव्हाण यांचेकडे देण्यात आला होता. त्यानुसार दोन्हीही मिसींग व्यक्तींना दिनांक २९.०१.२०२२ रोजी पोलीस स्टेशन शिरपुर येथे हजर केले. त्यावेळी त्या दोघांनीही त्यांचे एकमेकांवर प्रेम असुन ते दोघेही सोबत पळुन गेले होते असे सांगीतले. तसेच गणेश व शिवानी यांनी एकमेकांसोबतच लग्न करण्याचे सांगीतले, परंतु दोघांच्याही घरची परिस्थीती जेमतेम असल्याने लग्नास लागणारा खर्च त्यांचेकडे नव्हता. त्यावेळी दोघांचीही समजुत घालुन, दोघेही लग्नासंबधाने दोन दिवस विचार करा असे सांगुन त्यांना आपआपले नातेवाईकांचे ताब्यात दिले.

दिनांक ३१.०१.२०२२ रोजी गणेश शिवाजी जाधव व शिवानी घनश्याम मानवतकर हे दोघेही त्यांचे नातेवाईकांसह पोलीस स्टेशन ला आले व त्यांनी लग्न करायचे आहे असे सांगीतले. त्यावेळी ठाणेदार सुनिल वानखडे यांनी पुढाकार घेत दोघांचेही आईची लग्नास संमती असल्याची खात्री केली. दोघांचेही नातेवाईकांची लग्नास होकार असल्याने,तसेच दोघांचेही लग्नाचे वय पुर्ण होत असल्याने पोलीस स्टेशन शिरपुर चे आवारात गणेश शिवाजी जाधव व शिवानी घनश्याम मानवतकर यांचे लग्न लावुन दिले व त्यांना भावी जिवनाच्या शुभेच्छा दिल्या.

सदर लग्न सोहळया करीता ठाणेदार सुनिल वानखडे, सपोनि जगदीश बांगर, जमादार संजय घुले, संतोष पाईकराव, राजुभाऊ वानखडे, बेबीताई ईंगोले, पंजाब घुगे, महादेव चव्हाण, श्रीकृष्ण नागरे, विनोद घनवट, संतोष देशमुख, रामेश्वर जोगदंड, गौरीशंकर तेलंगे, उमाकांत तुपाडे, दोघांचेही नातेवाईक व ईतर ग्रामस्थ आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

Scanned with CamScanner